जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email-cp.thane.pro@mahapolice.gov.in

'' प्रेस नोट'' **दिनांक : २९/०४/२०२६**

''वृद्ध महिलांचा पायी पाठलाग करून सोनसाखळी चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक करून त्याचेकडुन जबरी चोरी केलेले ३,९५,०००/- रूपये किमतीचे २५ ग्रॅम वजनाच्या २ सोन्याच्या चैन हस्तगत करून सोनसाखळी चोरीचे २ गुन्हे उघडकीस आणले बाबत,''

''गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी''

----------oooo----------

दिनांक २१/०४/२०२६ रोजी दुपारी १२:०० वा चे सुमारास फिर्यादी महिला नामे विरजा सुधाकर कामत,वय ८० वर्षे, राह. २/४, साईदिप अपार्टमेंट, भुसारआळी, कळवा, ठाणे या मार्केट मधुन भाजी घेवुन घरी पायी जात असताना बिल्डींगचे लिफ्टसमोर उभ्या असताना एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांना धक्का देवुन त्यांच्या डाव्या कुशीला जखमी करून त्यांच्या गळयातील सोन्याची चैन जबरीने खेचुन तेथुन पळुन गेलेबाबत कळवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २१९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६) प्रमाणे दिनांक २१/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर प्रकारामध्ये यातील फिर्यादी महिला या पडुन जखमी झाल्यामुळे घडलेल्या गंभीर गुन्हयासंदर्भात मा. वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपासात गुन्हे शाखा घटक १, ठाणे कडुन करण्यात येत असताना गुन्हे शाखा घटक १ चे **पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, पोहवा/४१७४ संदीप महाडिक, पोशि/८०६६ प्रशांत लवटे, पोशि/२७५५ अमोल ढावरे** यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासुन त्याआधारे आरोपीताबाबत खात्रीलायक माहिती प्राप्त करून यातील आरोपीत नामे तेजु पोमु चव्हाण उर्फ तेजस, वय ३२ वर्षे, राह- जय भीम नगर पाईपलाईन, येलम्मा मंदिर जवळ, महात्मा फुले नगर, कळवा, ठाणे यास योग्य प्रकारे सापळा रचुन ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयामध्ये दिनांक २७/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीत याचेकडे पोलीस कस्टडी दरम्यान केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये त्याने दाखल गुन्हयासह नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील रबाळे पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं ३२२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(४) हा गुन्हा देखील केला असल्याचे निष्पन्न करून सदर दोन्ही गुन्हयांमध्ये त्याने जबरीने चोरी केलेले एकुण ३,९५,०००/- रूपये किंमतीच्या २५ ग्रॅम वजनाच्या २ सोन्याच्या चैन हस्तगत करण्यात आल्या आहेत.

उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे

अ.क्र.	पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नंबर व कलम
१	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. २१९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६)
२	रबाळे पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ३२२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(४)

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे यांची सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सचिन गायकवाड, पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, पोहवा/अविनाश पाटील, पोहवा/४१७४ संदिप महाडिक, पोहवा/७००३ धनंजय आहेर, पोहवा ३८१/शशिकांत सावंत, पोशि/८०६६ प्रशांत लवटे, पोशि/२७५५ अमोल ढावरे यांनी केली आहे.